# दारू पिउन असभ्य वर्तन करणा—या आरोपीस न्यायालयाने ठोठावली शिक्षा.

पोलीस स्टेशन भिसी अंतर्गत दारूच्या नशेत असभ्य वर्तन करण्या—या आरोपीस २७/०३/२०१९ रोजी **श्री. छल्लानी, प्रथम वर्ग न्यायाधिश, चिमुर यांनी ०३ महिने कारावासाची शिक्षा** ठोठावली.

पोलीस स्टेशन भिसी अंतर्गत दि. ०१/०३/२०१५ चे सांयकाळी यातिल **आरोपी नामे अनिल दयाराम सावसागडे** हा मौजा शंकरपूर बसस्टॉप समोर दारू पिवून धुंद नशेत आराडा ओरड करून असभ्य वर्तन करीत होता. पोलीस स्टेशन भिसी येथे सदर कृत्याची माहिती मिळताच आरोपीस त्याबात घेण्यात आले व पोस्टे भिसी येथे अप.क्र. ६०१७/२०१५ कलम ८५(१) मुंबई दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

आरोपी विरूद्ध पोस्टे भिसी येथील **पोहवा बलदरखॉ पठाण** यांनी सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक २७/०३/२०१९ रोजी **आरोपी नामे अनिल दयाराम सावसागडे वय २५ वर्षे, रा. शंकरपूर, ता. चिमुर, चंद्रपुर यास ०३ महिने कारावास व ५,०००/—रू दंड, दंड न भरल्यास १५ दिवस कारावास अशी शिक्षा श्री. छल्लानी, प्रथम वर्ग न्यायाधिश, चिमुर जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणाचा तपास **पोहवा बलदरखॉ पठाण** यांनी पुर्ण केला तर सरकार तर्फे **ॲड. संजय ठावरी, सरकारी अभियोक्ता, चिमुर यांनी युक्तीवाद केला. तर कोर्ट पैरवी म्हणुन सफौ, सुधाकर बुटके** यांनी काम पाहिले.

———————————————————————————

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# ऑनलाईन शॉपिंग करताय.....सावधान

सेकंड हॅन्ड शॉपिंग करीता आज अनेक ऑनलाईन साईटस् उपलब्ध आहेत ज्यावर जून्या ईलेक्ट्रॉनिक वस्तूसह जुन्या मोटर सायकल किंवा फोर व्हिलर सुध्दा विक्री करीता दिसुन येतात. बाजार भावा पेक्षा या साईटस्वर नक्कीच वस्तूंची किंमत ही कमी असते व ग्राहक त्यावरील वस्तू खरेदी करण्याचा मोहास बळी पडतात. परंतु याचाच फायदा घेत आता ऑनलाईन फसवणूक करणा—या आरोपींनी नवीन शक्कल लढवीली आहे. दुस—यांच्या नावे नसलेली वस्तु स्वताची दाखवुन त्या विक्री करीता दाखविण्यात येत आहे. आणि विशेष म्हणजे विश्वास संपादन करण्याकरीता ते खोटया ओळखपत्रांचा वापर करीत आहेत.

यापासुन सावध राहण्याची गरज आहे. असे ऑनलाईन फसवणूक करणारे आपण विशिष्ठ ठिकाणी काम करीत असुन तसे ओळखपत्र दाखवून ग्राहकांचा विश्वास संपादन करून मोठया प्रमाणात ग्राहकांची आर्थिक फसवणूक करीत आहे. त्यामुळे नागरिकांनी वेळीच सावध होउन खालील सुचनांचे पालन करावे.

जुन्या वस्तु किंवा वाहन विक्रीच्या अशा आमीषाला बळी पडु नये. वस्तु स्वत: पाहिल्या शिवाय किंवा विक्री करणा—याची खात्री पटल्याशिवाय कोणताही आर्थिक व्यवहार करू नये.

आपल्याला कोणतया नंबरवरून फोन आला याची ट्रुकॉलर किंवा यासारख्या ॲपमधून खात्री करावी व इतर राज्यांतून येणा—या फोन कॉल्सला रिप्लाय देउ नये.

विक्रेत्याने विश्वास संपादन करण्या करीता पाठविलेल्या आय कार्ड्स ची शहानिशा करावी जोपर्यंत विक्रेत्याची विश्वासहर्ता सिध्द होत नाही तोपर्यंत कोणतेही ऑनलाईन आर्थिक व्यवहार करू नये.

———————————————————————————————————————